# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 405/2022 दिनांक : 21.10.2022

## 1)जबरी चोरी :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 14.10.2022 रोजी 22.30 वा. चे सुमारास, लातुर फाटा नांदेड येथे, यातील फिर्यादी हा गावी जाण्यासाठी लातुर फाटा येथे वाहानाची वाट पाहत असतांना एक ईसम फिर्यादीजवळ आला व फिर्यादीस विचारपुस करू लागला त्यानंतर लगेच दोन ईसम मो सा वर बसुन फिर्यादी जवळ आले. त्याच्यातील एकाचे हातात खंजर सारखे हत्यार होते. दोन चोरटयांनी फिर्यादीला पकडुन पॅन्टच्या खिशात ठेवलेले नगदी 12,000/–रूपये व फिर्यादीच्या वरच्या खिशात ठेवलेला सॅमसंग कंपणीचा छोटा मोबाईल किंमती अंदाजे 1000/–रुपयाचा असा एकुण 13,000/–रूपयाचा ऐवज जबरीने चोरून घेतला व फिर्यादीचे पोटावर खंजरने वार करून गंभीर जखमी करून पळुन गेले. वगैरे **फिर्यादी गणेश पि. उमाजी राठोड, वय 42 वर्षे, व्यवसाय मजुरी बोअरवेल ऑपरेटर रा. कौठा व घोडज तांडा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 635/2022 कलम 392, 397, 34 भादवी सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असून तपास पोउपनि/श्री **विजय पाटील, मो.क्र. 9823155291** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**1)विमानतळ** :–दिनांक 20.10.2022 रोजी **10.45 ते 11.20** वा. चे दरम्यान, **बसने प्रवास करीत असतांना अर्धापुर ते नमस्कार चौक दरम्यान नांदेड येथे,** यातील तीन अनोळखी महिला आरोपीतांनी संगणमत करून बस मध्ये प्रवासा दरम्यान फिर्यादीचे बॅग मधील सोन्याचे दागीने व रोख रक्कम असा एकुण 6,97,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सौ. रोहिणी बाळासाहेब लाखे, वय 32 वर्षे, व्यवसाय गृहिणी रा. गोकुळनगर उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 359/2022 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री गिते, मो.क्रं. 7387791899** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण** :– दिनांक 19.10.2022 रोजी 16.00 ते 22.00 वा. चे दरम्यान, **राममंदीर एनडी.–4 शिवाजी चौक सिडको पेन्टचे दुकानाचे पाठीमागे सिडको नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्प्लेंडर प्लस कंपणीची काळया रंगाची मो. सा. क्रं एमएच–26/बीआय–1476 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी देवीकांत गणेशराव कल्लेपुरवार, वय 52 वर्षे, व्यवसाय टेलरकाम रा. एनडी–120 इंदिरा गांधी कॉलेजजवळ सिडको ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 634/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1912 तिडके, मो.क्रं. 9421394862** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद** :– दिनांक 08.10.2022 रोजी 23.30 ते दि. 09.10.2022 चे 04.00 वा. चे दरम्यान, **दिलीपसिंग कॉलनी नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो कंपणीची एचएफ डिलेक्स मॉडलची मो. सा. क्रं एमएच–26/बीएफ–7597 किंमती 25,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी श्रावणकुमार पि. थनाराम चौधरी, वय 30 वर्षे, दिलीपसींघ कॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 369/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/845 राठोड, मो.क्रं. 9921629005** हे करीत आहेत.

## 4)चोरी कलम 380 :–

**किनवट** :– दिनांक 20.10.2022 रोजी 01.00 ते 01.30 दरम्यान, **श्री अनिल किशनराव सुर्यवंशी, वय 52 वर्षे,** व्यवसाय व्यापार रा. राजेंद्रनगर किनवट जि. नांदेड येथे, यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे आडत दुकानाचे ऑफिस उघडे ठेवुन फिर्यादी व त्याचा नोकर हे बाहेर गेल होते. त्या संधीचा फायदा घेवुन टेबलच्या ड्रायव्हर मधील ठेवलेले अंदाजे आठ लाखारूपया पैकी अंदाजे तीन लाख रूपये चोरून नेले. वगैरे **फिर्यादी श्री अनिल किशनराव सुर्यवंशी, वय 52 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. राजेंद्रनगर किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 202/2022 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री पवार, मो.क्रं. 9850892665** हे करीत आहेत.

Scanned with CamScanner

## 5)विवाहीतेचा छळ :-

**कुंडलवाडी :-** दिनांक 25.12.2016 रोजी चे नंतर ते दिनांक 20.10.2022 चे दरम्यान, **मौ. डौर कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाही, तुला स्वयपाक येत नाही. तुझे माहेरहुन पाच लाख रुपये घेवून ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरिक व मानसिक छळ केला. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 112/2022 कलम 498(अ),323,504,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/1921 कदम, मो.क्रं. 9823017330** हे करीत आहेत.

## 6)आत्महत्येस प्रवृत केले :-

**इतवारा :-** दिनांक 15.10.2022 रोजी 12.00 चे सुमारास, **लोहारगल्ली गणेश टॉकीज रोड इतवारा नांदेड येथे,** यातील मयत नामे **काजलबाई मनोजसिंह ठाकुर, वय 32 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. लोहार गल्ली नांदेड,** हीस यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून मयताचे दिर व जाऊ यांनी लहान लेकराच्या भांडणाच्या कारणावरून नेहमी त्रास देवुन शिवीगाळ व टॉर्चर करून मानसीक त्रास दिल्याने त्यांच्या त्रासाला कंटाळुन आत्महत्या केली. तिचे आत्महत्येस यातील नमुद आरोपीतांनी प्रवृत केले. वगैरे **फिर्यादी शितलसिंह पि. हानुमानसिंह ठाकुर, वय 33 वर्षे, व्यवसाय इलेक्ट्रक मेकानिक रा. शारदाभवन हायस्कुलचे पाठीमागे चिरागगल्ली इतवारा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 287/2022 कलम 306, 504, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री गायकवाड, मो.नं. 9552574510** हे करीत आहेत.

## 7)गंभीर दुखापत :-

**1)कुंडलवाडी :-** दिनांक 09.10.2022 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी माचनुर ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून तु विनाकारण जादुटोणा केलास म्हणुन शिवीगाळ करून थापडबुक्यानी मारहाण केले व फिर्यादीचे नाकाचे व डाव्या डोळ्याचे आतील हाड बुकीने मारून फॅक्चर करून गंभीर जखमी केले. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी नागेश हाणमंत चरके, वय 24 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. माचनुर ता. बिलोली जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरन 111/2022 कलम 325, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2206 मेडेवार, मो. नं. 9890953645** हे करीत आहेत.

## 8)अपघात :-

**1)मुखेड :-** दिनांक 08.10.2022 रोजी 14.00 वा. चे सुमारास, **आखरगापाटी येथील श्रावण रॅपनवाड यांचे शेताजवळ ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत मुलगा नामे हुलाजी दिगांबर हत्तराळे, वय 22 वर्षे, रा. सकनुर ता. मुखेड जि. नांदेड** हा नांदेड येथुन परत गावाकडे येत असतांना आखरगा पाटी जवळील श्रावण रॅपणवाड यांचे शेताजवळ आला असता एसटी महामंडळ बस क्रमांक एमएच-14/बीटी-3011 चे चालकाने आपले ताब्यातील बस हयगय व निष्काळजीपणे भरवेगात चालवुन मयताची मो सा क्रं एमएच-26/एएम 8161 हीस जोराची धडक दिल्याने फिर्यादीचा मुलगा गंभीर जखमी झाल्याने त्याचेवर सरकारी दवाखाना नांदेड येथे उपचार चालु असतांना मयत झाला. त्याचे मरणास एसटी बस चालक कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी दिगांबर माधव हतराळे, वय 55 वर्षे, रा. सकनुर ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं. 315/2022 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून तपास **पोउपनि/श्री अन्सापुरे, मो.क्र. 9130052062** हे करीत आहेत.

## 9)शासकीय कामात अडथळा :-

**विमानतळ :-** दि. 20.10.2022 रोजी 01.00 वा. सुमारास, **महादेव मंदीरासमोर शिवनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे डीओ डयुटी असतांना पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलींग करत असतांना महादेव मंदीरासमोर शिवनगर येथे थांबलेल्या लोकांना घरी जावुन झोपी जा असे सांगीतले असता फिर्यादीस शिवीगाळ करत त्यांचे वर्दीला ओढुन वर्दीचे बटने तोडुन टाकली तसेच तुम्ही माझ्या नादी लागु नका नाही तर मी तुम्हाला सोडणार नाही मी पाहातोच तुम्ही येथे कशी डयुटी करता ते बघतो असे म्हणुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री प्रदिप भानुदास गोंड, ने. पोस्टे विमानतळ,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 358/2022 कलम 353, 332, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून तपास **सपोनि/श्री अनलदास, मो.क. 7020201376** हे करीत आहेत.

CS Scanned with CamScanner

## 10)जुगार :–

**1)लोहा :–** दिनांक 20.10.2022 रोजी 16.55 वा. चे सुमारास, शिवाजी चौक ते नांदेड जाणारे रोडवर डावे बाजुस असलेल्या एमएसईबी लगत माधव विश्वंभर कदम रा. पारडी यांचे पानपट्टी मागे पत्राचे शेडमध्ये लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना वेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1680/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे फिर्यादी पोहेकॉ/408, आशोक माधवराव केंद्रे, ने. पोस्टे लोहा यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे लोहा गुरनं 207/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ/1754 सुर्यवंशी, मो.क्र. 7057524134 हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

CS Scanned with CamScanner

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 406/2022 दिनांक : 21.10.2022**

**नांदेड पोलीस दलाकडुन पोलीस स्मृती दिनानिमित्त शहीदांना अभिवादन....**

21 ऑक्टोबर, 1959 रोजी गलवान व्हॅली लदाख येथे समुद्र सपाटी पासुन 1600 फुट उंचीवर कडाक्याच्या थंडीत एक कर्नल आणि 20 जवान हे पेट्रोलींग करीत असतांना चिनी सैनिकांनी अचानक भारतीय जवानावर घात लावुन केलेल्या हल्यात शहीद झाले होते.

आज पोलीस मुख्यालय नांदेड येथील स्मृती स्मारकास पोलीस अधिकारी व अंमलदारांनी शहीदाना अभिवादन करून पोलीस स्मृती दिन साजरा करण्यात आला. गेल्या वर्षभरात एकुण देशभरातुन 264 पोलीस अधिकारी व अंमलदार आपले कर्तव्य बजावत असतांना शहीद झाले होते. **मा. श्री. निसार तांबोळी, पोलीस उप महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र नांदेड** यांचे मार्गदशनाखाली व **मा. श्री. प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिकक्षक नांदेड सुचने प्रमाणे **मा. श्री. विजय धोंडगे,** राखीव पोलीस निरीक्षक यांचे नेत्रत्वाखाली तीस पोलीस अंमलदारांनी शोक सलामी देवुन तीन राऊंड हवेत फायर करण्यात आले. शहीदांच्या नावाचे वाचन **मा. श्रीमती डॉ. अश्वीनी जगताप,** पोलीस उप अधिक्षक(मु.) नांदेड, **मा. श्री. डॉ. सिध्देश्वर भोरे,** उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा नांदेड यांनी केले. शहीदांना मानवंदना देण्यासाठी प्रमुख अथिती यांनी पोलीस स्मृती स्मारकास पुष्पचक्र वाहुन अभिवादन केले. प्रमुख अथिती म्हणुन **मा. श्री बांगर साहेब,** प्रमुख जिल्हा न्यायाधीश, **मा. श्री. निसार तांबोळी,** पोलीस उप महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र नांदेड, **मा. श्री अभिजित राऊत,** जिल्हाधिकारी नांदेड. **मा. श्री. प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड हे हजर होते. तसेच या प्रसंगी **मा. श्री निलेश मोरे,** अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री. अर्चीत चांडक,** सहा पोलीस अधिक्षक बिलोली, **मा. श्रीमती शाफकत आमना,** सहा पोलीस अधिक्षक उपविभाग भोकर, **मा. श्रीमती डॉ. अश्विनी** जगताप, पोलीस उप अधिक्षक(मु.) नांदेड, **मा. श्री. चंद्रशेन देशमुख,** उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, **मा. श्री. विक्रांत गायकवाड,** उपविभागीय पोलीस अधिकारी धर्माबाद, **मा. श्री. सचिन सांगळे,** उपविभागीय पोलीस अधिकारी देगलुर, **मा. डॉ. सिध्देश्वर भोरे,** उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा, **मा. श्री. द्वाकादास** चिखलीकर पोनि स्थागुशा, **मा. श्री. जगदीश भंडरवार,** पोनि पोस्टे वजिराबाद, **मा. श्री. आशोक घोरबांड,** पोनि नांदेड ग्रामीण, **मा. श्री. भगवान धबडगे,** पोनि पोस्टे इतवारा, **मा. श्री नितीन काशीकर,** पोनि पोस्टे शिवाजीनगर, **मा. श्री. सुधाकर आडे,** पोनि पोस्टे भाग्यनगर, **मा. श्री. अनिरूध्द काकडे,** पोनि पोस्टे विमानतळ **मा. श्री. विजय धोंडगे,** रापोनि पो.मु. नांदेड, **मा. श्री. शिवाजी लष्करे,** सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड **श्री शामराव देवला राठोड, श्री. काशिनाथ बोरकर** रापोउपनि, पो. मु. नांदेड इतर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच कार्यालयीन कर्मचारी व प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी मोठया संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्र संचालन सपोउपनि श्री विठ्ठल कत्ते यांनी केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

CS Scanned with CamScanner